निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत
श्री.संजय बाबुराव निकाळे सेवानिवृत्
सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत
समिती कोपरगांव.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या/पंस/आस्था-1/1092/2024
अहिल्यानगर दिनांक 02/12/2024

संदर्भ :- 1. इकडील निलंबन आदेश क्र.पसं/आस्था-1/0922/2022 दिनांक 10.11.2017
2. इकडील आदेश क्र.पसं/आस्था-1/471/2018 दिनांक 15.05.2018
3. सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा.4/खा.चौ/सी.आर.163/2018 दिनांक 05 फेब्रुवारी 2019
4. इकडील आदेश जा.क्र.पंस/पशु/आस्था-1/669/2019 दिनांक 20.7.2029
5. गटविकास अधिकारी पंचायत समिती कोपरगांव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-1/1613/2023 दिनांक 18.08.2023
6. या कार्यालयाची नोटीस जा.क्र.पसं/आस्था-1/867/2024 दि.10.9.2024
7. श्री.संजय बाबुराव निकाळे सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांनी सादर केलेला नोटीसचा खुलासा दिनांक 12.11.2024
8. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.डिईएन 1895/1659/प्र.क्र.1209/20 दिनांक 24 नोव्हेंबर 1995
9. महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 70 व 72 (7) (5)

श्री.संजय बाबुराव निकाळे,सहाय्यक पशुधन विकास अधिकारी,हे पशुवैदयकीय दवाखाना दहीगांव बोलका ता.कोपरगांव येथे कार्यरत असताना कर्तव्यात कसुर करुन गैरवर्तणूक केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणुक ) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने श्री.निकाळे यांना संदर्भ क्रमांक 1 च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

श्री.निकाळे संजय बाबुराव ,सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ,पशुवैदयकीय दवाखाना दहीगांव बोलका ता.कोपरगांव यांना संदर्भ क्रमांक 2 च्या आदेशान्वये पशुवैदयकीय दवाखाना माहीजळगांव ता.कर्जत येथे पुन:स्थापीत करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.3 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचे अहवालानुसार श्री.निकाळे यांचेवर ठेवण्यात आलेले पाच आरोपांपैकी दोन आरोप अंशत: सिध्द होत असलेने संदर्भ क्र.4 अन्वये पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकारीता बंद करणेची शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

संदर्भ क्र.5 अन्वये श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव, यांचा दिनांक 10/11/2017 ते दिनांक 31.05.2018 ( एकुण 203 दिवस ) या कालावधीतील निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केला आहे.

संदर्भ क्र.6 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी , स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे हया काळातील प्रदाने ) नियम 1981 च्या नियम 72 (7) (5) मधील तरतुदीनुसार श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव, यांचा दिनांक 10/11/2017 ते दिनांक 31.05.2018 ( एकुण 203 दिवस ) कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन का समजण्यात येऊ नये ? याबाबतचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता.श्री.निकाळे यांनी संदर्भ क्र.7 अन्वये खुलासा सादर करुन खुलाश्यात दिनांक 10.11.2017 ते दिनांक 31.5.2018 या सेवा निलंबन कालावधीत आपले कार्यालयाच्या आदेशानुसार मी दिलेल्या मुख्यालयी उपस्थित राहिलो आहे.त्यामुळे सदर कालावधी हा कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन समजण्यात येऊ नये.तर सलग सेवा कालावधी धरण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.श्री.निकाळे यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करणेत येत आहे.

संदर्भ क्र. 8 व 9 नुसार ,महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहन अवधी ,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळांतील प्रदाने ) नियम 1981 मधील नियम-72(5)(7) मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन,मी मुख्य कार्यकारी अधिकारी ,श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत् सहाय्यक पशुधन विकास अधिकारी कुक्कुटपालन प्रकल्प् कोपरगांव ता.कोपरगांव यांचा निलंबन कालावधी दिनांक 10/11/2017 ते दिनांक 31/05/2018 ( एकुण 203 दिवस ) हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ ,कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन मानन्यात येईल असे आदेश देत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.निकाळे संजय बाबुराव सेवानिवृत् सहाय्यक पशुधन विकास अधिकारी कुक्कुटपालन प्रकल्प् ता.कोपरगांव यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमांक 202412021100001 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 06-02-2025 17:27:05
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगांव.

2/- सदरचा आदेश सबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास संत्वर सादर करावी.

प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती संगमनेर / कोपरगांव.